# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:02.06.2026** **वार:मंगळवार**

1. विधान परिषदेच्या 17 जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपली, बंडखोरीमुळे गुरुवारनंतरच चित्र स्पष्ट होणार
2. राज्यसभेच्या 24 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना जारी
3. इ बसेससाठी आवश्यक असलेली चार्जिंग स्टेशन्स उभारण्याच्या कामाला गती देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश आणि
4. आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेत पुण्याची आरोही देशपांडे मुलींमध्ये पहिली

**<u>विधानपरिषद निवडणूक</u>**

राज्य विधानपरिषदेच्या 17 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. जवळपास सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाल्यानं गुरुवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर निवडणुकीचं चित्र स्पष्ट होईल.
महायुतीच्या जागावाटपामध्ये पुण्यातील विधानपरिषदेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाली असून विक्रम काकडे आणि सुनील टिंगरे या दोघांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे श्रीकांत पाटील यांनी अर्ज दाखल केला.

नाशिकमध्ये महायुतीतर्फे शिवसेनेचे नरेंद्र दराडे यांनी उमेदवारी अर्ज भरला. महाविकास आघाडीतर्फे मात्र कोणीही उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. मात्र भाजपा नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. जिल्ह्यात 9 उमेदवारांनी 14 अर्ज भरले आहेत.

सोलापूर जिल्ह्यात महायुतीतर्फे भाजपाचे राजेंद्र राऊत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

अहिल्यानगर विधानपरिषद मतदारसंघात भाजपाचे प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

विधान परिषदेच्या रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे यांनी महायुतीतर्फे उमेदवारी अर्ज भरला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून सुरेंद्रनाथ माने यांनी उमेदवारी अर्ज भरला. या मतदारसंघात चार जणांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

ठाणे मतदारसंघासाठी शिवसेनेचे रवींद्र फाटक यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे अभिजीत पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

भंडारा - गोंदिया मतदारसंघासाठी महायुतीकडून भाजपाचे अविनाश ब्राह्मणकर यांनी तर काँग्रेसकडून प्रफुल अग्रवाल आणि दिलीप बनसोड यांनी अर्ज दाखल केले. वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर मतदारसंघासाठी काँग्रेसच्या शैलेश अग्रवाल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

छत्रपती संभाजीनगर - जालना मतदारसंघासाठी महायुतीकडून सुहास शिरसाट यांनी तर महाविकास आघाडी कडून देवयानी पाटील डोणगावकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघात समीर सत्तार यांनी बंडखोरी करत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला.

दरम्यान, महायुतीचे सर्व 17 उमेदवार विजयी होतील असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. महायुतीमधे कोणतेही मतभेद नसून सर्व जागा महायुती जिंकेल, असा विश्वास महसूलमंत्री आणि भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनीही व्यक्त केला आहे.

आज अर्जाची छाननी होणार असून 4 जूनपर्यंत अर्ज मागे घेता येतील. त्याचदिवशी निवडणुकीचं चित्र स्पष्ट होईल.

**<u>राज्यसभा निवडणूक</u>**

राज्यसभेच्या 24 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना काल जारी करण्यात आली. येत्या 8 जूनपर्यंत या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. 18 जूनला मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. या 24 जागांमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेचा समावेश आहे.

**<u>मुख्यमंत्री इबस</u>**

विकसित महाराष्ट्र संकल्पने अंतर्गत 2047 पर्यंत एसटीचा 100 टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करायचा आहे. या अनुषंगानं बसेससाठी आवश्यक असलेली चार्जिंग

स्टेशन्स उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या संदर्भात झालेल्या बैठकीत ते काल बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक या बैठकीत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणा अंतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई-बसेसचा वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. या धोरणानुसार पंधराशे ई-बसेसना बसच्या किमतीच्या 10 टक्के किंवा कमाल 20 लाख रुपये इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**<u>लाडकी बहीण-मुंबई</u>**

लाडकी बहीण योजनेतून विविध कारणांमुळं 80 लाखांहून अधिक लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आली आहे. अडीच लाखापेक्षा अधिक उत्पन्न, ई-केवायसीची अनुपलब्धता, कुटुंबातल्या सदस्याच्या नावे वाहन, इतर सरकारी योजनांचा लाभ यासारख्या कारणामुळं ही नावं वगळल्याचं राज्याच्या महिला बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं. ज्या अर्जदारांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केली आहे, ज्या लाभार्थ्यांच्या नावावर वाहन नोंदणी नाही आणि तरीही योजनेचा लाभ स्थगित झाला आहे, किंवा ज्या लाभार्थ्यांचा;मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण; योजनेसह इतरही योजनांचा लाभ स्थगित झाला आहे, त्यांनी तातडीने याबाबत महिला आणि बालविकास विभागाशी संपर्क साधावा. या सर्व प्रकरणांची विभागाकडून पुन्हा पडताळणी करण्यात येईल, असं आश्वासनही तटकरे यांनी दिलं.

**<u>जेईई ॲडव्हान्स निकाल</u>**

भारतीय तंत्रज्ञान संस्था अर्थात आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. या परीक्षेत 56 हजार 880 विद्यार्थी यशस्वी झाले असून यामध्ये 46 हजार 773 विद्यार्थ्यांचा आणि 10 हजार 107 विद्यार्थिनींचा समावेश आहे. दिल्ली विभागातला शुभम कुमार 360 पैकी 330 गुण मिळवून देशात सर्वप्रथम आला. विद्यार्थिनींमधे पुण्याची आरोही देशपांडे पहिली आली आहे. तिने परीक्षा दिल्ली विभागातून दिली होती. तिला 280 गुण मिळाले असून सर्वसाधारण यादीत ती 77व्या क्रमांकावर आहे.

**<u>पांढरे जांभूळ</u>**

पालघर जिल्हा म्हटलं की बहाडोलीची प्रसिद्ध काळी जांभळं डोळ्यासमोर येतात. मात्र आता मोखाड्याच्या डोंगररांगांमध्ये, थेट थायलंडमधून आलेलं पांढरं जांभूळ पिकवलं जात आहे. आणि हा अनोखा प्रयोग करून दाखवलाय एका पीएच.डी. धारक तरुणाने. मोठ्या

पगाराच्या नोकरीचा मार्ग सोडून आपल्या शिक्षणाचा उपयोग शेतीसाठी करणाऱ्या डॉ. सुमित ढाक यांची ही प्रेरणादायी कहाणी.....

**कृषी अभियांत्रिकीमध्ये B.Tech, M.Tech आणि मृदसंधारण विषयात Ph.D. केलेले डॉ. सुमित ढाक यांनी थेट थायलंडमधील 'व्हाईट जांभूळ' मोखाड्याच्या मातीत फुलवलं आहे. मोठ्या पगाराच्या नोकरीच्या संधी असतानाही त्यांनी शेतीची वाट निवडली. विशेष म्हणजे त्यांच्या संशोधन प्रबंधाचा जर्मन भाषेत अनुवाद करण्यात आला आहे. एवढं उच्च शिक्षण असूनही त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण आणि आदिवासी भागातील शेतीसाठी करण्याचा निर्णय घेतला. मोखाड्यासारख्या डोंगराळ भागात त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, ड्रिप इरिगेशन आणि वैज्ञानिक शेती पद्धतीचा वापर करून थायलंडच्या पांढऱ्या जांभळाची यशस्वी लागवड केली आहे. कमी पाण्यात वाढणारे आणि बाजारात चांगली मागणी असलेले हे फळ आता शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा नवा पर्याय ठरत आहे. डॉ. सुमित ढाक यांचा हा प्रयोग आता अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. शिक्षण आणि शेतीची सांगड घातली तर मातीतूनही सोनं उगवू शकतं हे त्यांनी सिद्ध करून दाखवलं आहे.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी पालघरहून नीता चौरे.**

## दर वाढ

व्यावसायिक वापरासाठीच्या सिलेंडरच्या दरांमध्ये वाढ झाली आहे मात्र घरगुती वापरासाठीच्या गॅस सिलेंडरच्या दरात बदल झालेला नाही. 19 किलो वजनाचा व्यावसायिक सिलेंडरचा दर 43 रुपयांनी तर पाच किलोच्या सिलेंडरचा दर 11 रुपयांनी वाढला आहे.

## नीट पेपर फुटी

नीट युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी दिल्ली न्यायालयानं तीन आरोपींना येत्या 15 जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यातील लातूरचे डॉक्टर मनोज शिरुरे यांच्यावर तीन विद्यार्थ्यांना रसायशास्त्राचे प्रश्न पुरवल्याचा तर पुण्यातील शिक्षिका मनिषा हवालदार यांनी अन्य एक आरोपी तेजस शहा याला भौतिकशास्त्राचे प्रश्न पुरवल्याचा आरोप सीबीआयनं गुन्हा दाखल करताना नोंदवला आहे.

दरम्यान, नीटची फेरपरीक्षा सध्याच्या लेखी स्वरुपाऐवजी संगणकावर घ्यावी अशी मागणी करणारी याचिका काल सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली.

**पूल बंद**

पुणे जिल्ह्यात राजगड तालुक्यातल्या खानापूर ते पानशेत मार्गावरचा पानशेत वसाहतीजवळचा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. हा पूल संरचनात्मकदृष्ट्या अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे आढळल्यानंतर तो सर्व प्रकारच्या जड आणि हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद केल्याचा आदेश जिल्हादंडाधिकाऱ्यांनी जारी केला. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करुन वाहतूक व्यवस्थेला सहकार्य करावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या पार्थिव देहावर काल मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. रविवारी रात्री मुंबईतल्या राहत्या घरी त्यांचं निधन झालं. त्या 89 वर्षांच्या होत्या.

**पाऊस**

लातूर शहरात काल वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. गेल्या दोन दिवसांपासून होत असलेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे शहरासह ग्रामीण भागात गारवा निर्माण झाला आहे.

**हवामान**

राज्याच्या सर्वच विभागात आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**